

प्रत्येक रात्र–नवी गोष्ट
अरेबियन नाईट्स्
परी प्रकाशन

**प्रत्येक रात्र नवी गोष्ट...**
**अरेबियन नाईटस्**

◆ ———————

© सुरक्षित

◆ ———————

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

◆ ———————

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

◆ ———————

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

◆ ———————

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

◆ ———————

**किंमत :**
रुपये १३०/-

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | सुरईतला राक्षस | ३ |
| २. | जादूचा मासा | ९ |
| ३. | काळ्या बेटांचा बादशहा | १५ |
| ४. | राजा आणि हकीम | २० |
| ५. | मोहम्मद लेझीबोनची कथा | २७ |
| ६. | मुंगूस आणि उंदीर | ३३ |
| ७. | अलीबाबा आणि चाळीस चोर | ३६ |
| ८. | छोटा कुबडा | ४९ |
| ९. | अलादीन आणि जादूचा दिवा | ५५ |
| १०. | बेपर्वा वजीर | ७१ |
| ११. | सिंदबादच्या सात सफरी | ७४ |
| १२. | अबुल हसन | १०९ |
| १३. | खुदादाद – ईश्वराची देणगी | ११८ |
| १४. | शमसुद्दीन आणि नुरुद्दीन | १२८ |
| १५. | बहिणींचा मत्सर | १४७ |
| १६. | जादूचा घोडा | १६२ |
| १७. | राजकुमाराचे धाडस | १६७ |
| १८. | तीन सफरचंद | १७२ |



# सुरईतला राक्षस

एके काळी अल्जिमेरू देशात यासीन नावाचा कोळी राहत होता. तो अतिशय दयाळू होता. आपली पत्नी आणि चार मुलांसह तो गरिबीत दिवस काढत असे; पण तरीही तो समाधानी होता.

रोज सकाळी समुद्रावर जाऊन मासे पकडणे हाच त्याचा व्यवसाय. त्यावरच त्याचे जीवन चाले; पण त्याचा एक नियम होता– तो समुद्रात फक्त तीन वेळा गळ टाकायचा. या तीन खेपांमध्ये जितके मासे गळाला लागतील तितक्यावरच तो आपली गुजराण करत असे. त्यामुळे कधी भरपूर मासे गळाला लागत, तर कधी हात हलवत घरी परत यावे लागायचे. अशा वेळी संपूर्ण कुटुंबालाच उपवास घडत असे.

यासीन सकाळी कामावर जायला निघाला की त्याची पत्नी व मुले त्याला हात उंचावून निरोप देत असत व मनापासून प्रार्थना करत,

''हे समुद्र देवता, आम्हाला समृद्ध कर.''

यासीन फक्त हसायचा आणि मान हलवत निघून जायचा.

एके दिवशी सकाळी नेहमीप्रमाणे आपले जाळे घेऊन तो समुद्रापाशी आला. समुद्र अगदी शांत दिसत होता. यासीनने जाळे समुद्रात फेकले आणि मासे अडकण्याची वाट पाहत तो किनाऱ्याशी बसून राहिला. थोड्या वेळाने जाळ्याला थोडीशी ओढ लागल्यासारखे वाटू लागले म्हणून त्याने जाळे खेचायला सुरुवात केली; पण जाळे फारच जड लागत होते.

'बापरे ! सगळेच मासे गळाला लागले की काय !' यासीनच्या मनात विचार चमकून गेला. आज भरपूर मासे मिळणार म्हणून तो भलताच खूश झाला होता; पण जाळे इतके जड होते की ते ओढता ओढता त्याची दमछाक होऊ लागली. कसेबसे 'हाश्श हुश्श' करत त्याने जाळे पाण्याबाहेर काढले आणि पाहतो तर काय ! त्या जाळ्यात एक मोठा मातीचा घडा अडकलेला होता.

यासीनचा सगळा आनंद एका क्षणात मावळला.

''हाय, रे दैवा ! या बिनकामाच्या घड्यासाठी केवढे कष्ट करावे लागले.''

पण दुसऱ्याच क्षणी त्याचा मनात आले, 'हा घडा एवढा जड लागतोय त्या अर्थी तो नक्कीच हिरे–माणिक मोतीने भरलेला.'

हा विचार डोक्यात येताच तो पटकन उठला. त्याने घड्यावर बसवलेले झाकण काढले मात्र तो पुन्हा निराश झाला. घडा वाळूने काठोकाठ भरला होता.

हताश मनाने त्याने पुन्हा जाळे पाण्यात टाकले. यावेळी तर एक मेलेले खेचरच त्याच्या गळाला लागले.

'अरे देवा, आता ही शेवटचीच वेळ. यावेळी नशिबाने साथ दिली नाही, तर आजही उपाशीच राहावे लागणार बहुतेक.' यासीन आभाळाकडे पाहत म्हणाला. देवाचे नाव घेऊनच त्याने तिसऱ्यांदा जाळे पाण्यात फेकले. जाळे ओढायला सुरुवात करताच ते पुन्हा जड लागू लागले.

'आता आणि काय वाढून ठेवलंय कुणास ठाऊक ! चला बघूया तरी' असे म्हणत त्याने पूर्ण शक्तिनिशी जाळे वर खेचले. यावेळी त्या जाळ्याबरोबर एक मोठी पितळेची सुरई वर आली होती. लांबट आकाराच्या त्या सुरईवर अत्यंत सुंदर नक्षीकाम केलेले होते.

'चला. निदान ही सुरई विकून तरी मी थोडेफार पैसे मिळवू शकेन; पण याच्या आतमध्ये काय असेल बरं ?' असं म्हणत तो सुरईचे झाकण उघडण्याचा प्रयत्न करू लागला; पण झाकण इतके घट्ट होते की सगळी ताकद लावूनही ती उघडली जाईना. आता हे झाकण कसे उघडावे असा विचार करत असतानाच त्याला एक युक्ती सुचली. यासीनने आपल्या खिशातील चाकू बाहेर काढला व त्या चाकूने झाकणाचे बूच तोडून टाकले.

अतिशय उत्सुकतेने तो सुरईमध्ये डोके घालून आत काय दिसते का ते पाहू लागला; पण सुरईमध्ये तर काहीच दिसेना. इतक्यात त्या भांड्यातून 'झू ऽऽऽ झूप ऽऽऽ सटॅक' असा आवाज आला आणि धुराचा एक लोळ भपकन बाहेर आला. यासीनच्या नाकातोंडात धूर जाऊन तो खोकू लागला. खोकला थोडा कमी झाल्यावर 'हा काय विचित्र प्रकार' म्हणून तो भांड्याकडे पाहू लागला. मात्र समोरचे दृश्य पाहून त्याची बोबडीच वळली.

आता त्या काळ्याकभिन्न धुरामध्ये एक मानवी आकृती दिसू लागली होती. मानवी कसली, राक्षसीच म्हणा ना...! त्या धुराने आता एका महाकाय जीनचे रूप घेतले होते. डोक्यावरचे भले मोठे टक्कल, त्याच्या मधोमध असणारी व पाठीवर रुळणारी लांबलचक शेंडी, भव्य कपाळ, काळ्याभोर भुवया, आग ओकणारे भले मोठे डोळे, गळ्यात मण्यांच्या मोठ्या मोठ्या माळा, अगडबंब उघडा देह आणि कमरेखाली धोतर अशा अक्राळविक्राळ रूपातला तो जीन ढगांचा गडगडाट झाल्यासारखा हसत होता.

‘‘हा, ऽऽ हा ऽऽ हाऽऽ हा ऽऽ मी आहे जीन ! तुझं आयुष्य बरबाद करीन !’’

यासीनच्या हातापायातले त्राणच निघून गेले होते. तो मटकन खाली बसला. त्याचे हात–पाय थरथरू लागले. अंगाला दरदरून घाम सुटला. भीतीने त्याची दातखिळीच बसली होती. काहीतरी बोलावे म्हणून त्याने तोंड उघडले; पण त्याचे दात एकमेकांवर आपटू लागले. कसेबसे त्याने विचारले,

‘‘क..क..क.. कोण आ... आहेस तू ऽऽ ?’’

‘‘हा ऽऽ हा ऽऽ हा ऽऽ मी कोण ? मी आहे जीन ! तुझी खांडोळी करीन !’’ आपले सुळ्यांसारखे दात विचकवत जीन म्हणाला.

‘‘इथे... इथे कशाला... आला आहेस ?’’ यासीन अजून थरथरतच होता.


‘‘मी...? तूच तर मुक्त केलंस मला या तुरुंगातून ! पण हे दुर्दैवी माणसा, तुला अजून माहीत नाही तू किती मोठी चूक केली आहेस ते!’’ जीन.

‘‘क..क..क.. काय झालं ?’’ यासीन.

‘‘हा.. हा.. हा ! तू मला सोडवलंस मात्र त्या बदल्यात तुला एक मोठी शिक्षा मिळणार. पुढच्या एका तासाच्या आत तुला अत्यंत भयानक पद्धतीने मृत्यू येईल.’’ जीन

‘‘काय ? अरे... अरे... पण मी केलंय तरी काय ? मी कधीच कुणाचं काहीच वाईट केलेलं नाही.’’ यासीन रडकुंडीला आला होता.

‘‘हा ऽऽ हा ऽऽ हा ऽऽ मी आहे जीन ! मला वाट्टेल ते करीन ! तू कोण मला विचारणारा ? बोल लवकर, तुला कशा पद्धतीने मरायला आवडेल ?’’



''अरे ए जीनोबा, का तू मला मारायला टपलायस बाबा ? मी तुला सोडवलं ना, मग आता तू मला सोडून दे. हवं तर आयुष्यभर तुझा गुलाम बनून राहतो. तुला हात जोडतो. तुझ्या पाया पडतो.'' म्हणत यासीनने अक्षरश: जीनच्या पायावर लोळण घेतली व ओक्साबोक्सी रडू लागला.

''एऽऽ, तुझी फालतू बकबक बंद कर. मला वेळ नाही ऐकायला. तुला शेवटची संधी देतोय. बोल लवकर नाहीतर इथंच तुझी मुंडी मुरगाळून टाकेन.'' जीन डोळे वटारत म्हणाला.

आता काही आपली सुटका नाही हे यासीनला समजून चुकले. त्याने आपल्या बायको, मुलांची शेवटची आठवण काढून घेतली. डोळे पुसले व थोडा शांत झाला. कसेही करून आता मरायचेच आहे; पण इतक्यात हार मानायची नाही असे त्याने मनाशी पक्के ठरवले. थोडा विचार करून तो जीनला म्हणाला, ''हे बघ, तुला हवे तर तू मला मार; पण त्याआधी तू कोण, कुठला ते तरी सांग. एवढा अगडबंब माणूस तू ! या सुरईमध्ये कसा काय अडकलास ?''

त्याचा प्रश्न ऐकून जीनचे मन हेलावले. त्यालाही आपल्या पूर्वायुष्याची कथा सांगावीशी वाटू लागली.

''तुला ऐकायचीय माझी कहाणी ? ऐक तर मग –''

''मी एक अत्यंत दुष्ट जीन होतो. लोकांना त्रास देणं, छळणं, मारणं मला फार आवडायचं. अगदी किडे, मुंग्यांसारखं मी त्यांना चिरडून टाकायचो. स्वत:च्या ताकतीचा फार गर्व होता मला. सगळीकडे माझी दहशत पसरावी म्हणून विनाकारण क्रूरपणे वागायचो. लोक घाबरून पळायला लागले की मला आसुरी आनंद व्हायचा.

पण स्वर्गातला देव मात्र हे सर्व पाहत होता. माझी पापं मोजत होता. माझ्या पापांचा घडा भरल्यावर त्याने मला या सुरईमध्ये बंद केलं आणि समुद्रात फेकून दिलं. गेली एक हजार वर्षे मी या समुद्रात तरंगत होतो.''

''एक हजार वर्षं...?'' यासीनने आश्चर्यचकित होत विचारले.

''होय. संपूर्ण एक हजार वर्षे ! या समुद्रात येऊन शंभर वर्षे झाल्यानंतर मी विचार केला की आता जो कोणी मला सोडवेल त्याला मी इतका श्रीमंत बनवेन की त्याने स्वप्नातही कधी इतका पैसा बघितला नसेल.''

''असं का ? मी तर तुला सोडवलंय मग...''

''पण शंभर वर्षांनंतरही मला कोणीच सोडवायला आले नाही.'' जीन त्याचे वाक्य मध्येच तोडत म्हणाला.

''मी फार निराश झालो. पुढची चारशे वर्षे अशीच निघून गेली. यानंतर मी पुन्हा निर्णय घेतला. आता जो कोणी मला यातून मुक्त करेल त्याच्या सर्व इच्छा मी पूर्ण करेन; पण पुन्हा माझ्या पदरी निराशाच पडली. अशीच एक हजार वर्षे लोटली. आता मात्र मी फार चिडलो होतो.

म्हणून मी ठरवले की जो कोणी मला मुक्त करेल त्याला मी ठार मारीन. तू मला या तुरुंगातून मुक्त केलंस. चल ! आता मरणाला तयार हो !''

''काय ! मी तुला सोडवलं म्हणून खूश होण्याऐवजी तू मला मारणार ? असं करू नकोस. मी एक गरीब माणूस आहे. माझी बायको मुलं माझी वाट बघत असतील. मला जाऊ दे.'' यासीन कळवळून म्हणाला.

यासीनची विनंती ऐकून जीन फारच भडकला. रागाने हाताच्या मुठी आवळत तो म्हणाला,

''ए ! तू आता माझं मन वळवू शकत नाहीस. सांग लवकर, तुला कसं मरण पाहिजे ?''

इतक्यात यासीनला एक युक्ती सुचली. तो जीनला म्हणाला,

''तू मला तुझी सगळी कथा सांगितलीस; पण एक गोष्ट मात्र मला अजूनही पटत नाहीय. एवढा मोठा जीन तू ! या एवढ्याशा सुरईमध्ये कसा काय राहू शकतोस ?''

''म्हणजे ? तुला पटत नाही की मी गेली हजार वर्षे या सुरईमध्ये राहतोय ते !'' जीन उसळून म्हणाला.

''छे ! मुळीच नाही. कसं शक्य आहे ते ?''

जीन पुन्हा रागाने फुरफुरला, ''तुला पटत नाही ना. थांब, मी तुला आत जाऊन दाखवतोच.'' असे म्हणत त्याने आपल्या शरीराचा आकार बदलायला सुरुवात केली. हळूहळू त्याच्या शरीराचे रूपांतर धुरामध्ये होऊ लागले व 'सुईऽऽऽ सटाक' असा आवाज होऊन तो अदृश्य झाला. आता यासीनने एकदम चपळाईने बाजूला पडलेले झाकण उचलले व सुरईला लावून टाकले आणि हसत हसत म्हणाला, ''जीनोबा, आता तू बोल तुला कसं मरण पाहिजे ? फेकून देऊ का पुन्हा समुद्रात ?''

आता जीन फारच घाबरला. आपल्याला यासीनने चांगलेच फसवले हे त्याच्या लक्षात आले. तो ओरडलाच, ''अरे यासीन, असं करू नकोस. मला बाहेर काढ बघू आतून.''

''मुळीच नाही. मला अजून भरपूर जगायचंय. आता मी या समुद्रकिनाऱ्यावर एक घर बांधणार आणि जो कोणी मच्छिमार इथे येईल त्या प्रत्येकाला तुझ्याबद्दल सांगणार. मग तुला पुन्हा कोणीही सोडवणार नाही. मग बस आयुष्यभर समुद्रात तरंगत !'' यासीन कुत्सितपणे म्हणाला.

''अरे, मी काही तुला खरोखर मारणार नव्हतो. फक्त तुझी जराशी मजा केली मी. मला लवकर सोडव आता.''

''माझा तुझ्यावर मुळीच विश्वास नाही. मी तुझं काहीही ऐकणार नाही.''

आता जीन फारच काकुळतीला आला. तो यासीनच्या हातापाया पडू लागला. ''हे बघ, तू जर मला इथून सोडवलंस तर मी तुला भरपूर पैसे देईन. विश्वास ठेव माझ्यावर !'' जीन म्हणाला.

यासीन मुळातच फार दयाळू माणसू होता. जीनला पुन्हा समुद्रात फेकून द्यावे असे त्यालाही वाटत नव्हते; पण तरीही याच्यावर विश्वास कसा ठेवायचा ? तो म्हणाला,

''मी तुला बाहेर काढीन; पण त्याआधी मला एक वचन दे. तू मला मारणार नाहीस किंवा इजाही करणार नाहीस.''

''दिल ! दिलं !! तुला पाहिजे ते दिलं. तू स्वप्नातही विचार केला नसशील. एवढा श्रीमंत होशील तू !''

यासीन अजूनही थोडा घाबरलेला होता; पण त्याने जीनवर विश्वास ठेवायचे ठरवले. हळूहळू पावले टाकत तो त्या सुरईजवळ गेला आणि झटकन त्याचे झाकण काढून टाकले. पुन्हा स्फोट झाल्यासारखा आवाज झाला आणि जीनची अक्राळविक्राळ आकृती गडगडाट करत बाहेर आली. तो पहिल्यापेक्षाही भयानक दिसत होता. बाहेर आल्याबरोबर त्याने पहिल्यांदा ती सुरई हातात घेतली व समुद्रात लांब फेकून दिली.

यासीनला वाटले, आपण पुन्हा फसलो. हा नक्कीच आपल्याला ठार मारणार; पण जीनने हसत हसत त्याच्याकडे बघितले व म्हणाला,

''तुझा अजूनही माझ्यावर विश्वास नाही ? मी आहे जीन ! तुला श्रीमंत बनवीन ! चल माझ्याबरोबर.''

लांबलांब ढांगा टाकत जीन पुढे व यासीन त्याच्या मागे जाऊ लागला. बराच प्रवास केल्यानंतर ते दोघे एका पहाडीपाशी आले. त्याच्या पायथ्याशी एक सुंदर तळे होते. चहूबाजूंनी उंच-सखल टेकड्यांनी वेढलेला तो प्रदेश अत्यंत निर्जन होता.

त्या तळ्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे भरपूर मासे होते. लाल, निळे, पिवळे, पांढरे अशा विविध रंगांचे तर काही अंगावर ठिपके असणारे, चट्टेरी, पट्टेरी मासेही होते. ते सगळेजण अगदी मजेत पाण्यामध्ये उसळ्या मारत होते. ते सुंदर दृश्य पाहून यासीनला फारच मजा वाटली. जीन म्हणाला,

''इथे भरपूर मासे आहेत. रोज इथेच गळ टाकत जा आणि रोज विविध रंगांचे मासे इथल्या सुलतानाला नेऊन देत जा. लवकरच तू भरपूर श्रीमंत होशील.''

यासीन त्याला काही विचारणार इतक्यात जीनने जमिनीवर जोरात लाथ मारली. जमीन एकदम दुभंगली व आतून एक धुराचा लोट बाहेर आला. तो लोट जीनभोवती वेढला गेला व त्याच्यासकटच पुन्हा जमिनीत गडप झाला. जमीन पुन्हा पूर्वीसारखी झाली.

यासीनला फारच आश्चर्य वाटले. आज दिवसभरात घडलेल्या सगळ्या घटना खूपच धक्कादायक होत्या. ''जर जीनने सांगितलेले खरे असेल, तर मी नक्कीच खूप श्रीमंत होईन.'' असा विचार करून त्याने आपले नशीब आजमावायचे ठरवले.

✦✦

# जादूचा मासा

जीनने सांगितल्याप्रमाणे यासीनने त्या तलावात जाळे टाकले. जाळ्यात अडकलेले रंगीबेरंगी मासे पाहून त्याला फार आनंद झाला. ते सर्व मासे घेऊन तो सुलतानाच्या राजवाड्यापाशी पोहोचला.

सुलतानाचा भव्य राजवाडा पाहून यासीन तिथेच थबकला. भव्य प्रवेशद्वार, नक्षीदार कमान, बाजूलाच असलेला सुंदर बगीचा, तिथे उडणारे रंगीबेरंगी कारंजे एवढा सगळा थाट पाहून त्याचे डोळे दिपून गेले. आपलाही एखादा टुमदार बंगला असावा असे त्याला वाटू लागले. विचार करतच तो प्रवेशद्वारापाशी आला. इतक्यात तेथील दोन द्वारपालांनी त्याला अडवले.

''कोण आहेस तू ? काय काम आहे ?'' एकाने दरडावून विचारले.

''मी यासीन. मी एक कोळी आहे... सुलतान साहेबांसाठी मी एक भेटवस्तू आणली आहे. कृपया मला त्यांना भेटू द्या.'' यासीन म्हणाला.

''ठीक आहे. मी निरोप पाठवतो.'' असे म्हणत द्वारपालाने एका सेवकाला आत पाठवले.

राजदरबारातील सिंहासनावर सुलतान ऐटीत बसला होता. बाजूलाच दोन दासी त्याला पंख्याने वारा घालत होत्या. इतक्यात सेवक तिथे आला.

''सुलतानाचा विजय असो !'' सेवक अदबीने म्हणाला.

''काय निरोप आहे ?'' सुलतानाच्या आवाजात जरब होती.

''बाहेर एक कोळी आला आहे. आपल्यासाठी काही भेटवस्तू घेऊन आला आहे.'' सेवक म्हणाला.

''अस्सं ! पाठवून दे त्याला आत.'' सुलतान म्हणाला.

निरोप घेऊन सेवक निघून गेला. सुलतान विचार करू लागला, कोळ्याने आपल्यासाठी भेटवस्तू आणली आहे म्हणजे नक्कीच काहीतरी खाद्यपदार्थ असणार. चला ! म्हणजे आज जेवणात चमचमीत पदार्थ खायला मिळणार तर ! सुलतानाचे डोळेआनंदाने चमकले. मेजवानीच्या विचारानेच त्याच्या तोंडाला पाणी सुटू लागले होते. इतक्यात यासीन तेथे आला.

''सुलतानांचा विजय असो.'' यासीन वाकून म्हणाला.

''बोल, काय आणले आहेस माझ्यासाठी ?'' सुलतानाने विचारले.

''हे पाहा.'' असे म्हणून यासीनने एक घडा सुलतानसमोर ठेवला.


''वाहवा ! अतिसुंदर !! मी आजपर्यंत इतके सुंदर मासे कधीच पाहिले नव्हते. लाल, गुलाबी, पांढरे, सोनेरी... किती हे रंग ! अहाहा!'' सुलतान फारच आनंदला होता. त्याने सेवकाला बोलावून तो माश्यांचा घडा दिला व म्हणाला,

''आज रात्रीच्या जेवणात या माश्यांचे कालवण करायला सांग.'' एवढे बोलून तो यासीनकडे वळला.

''तू आज आम्हाला खूश केलेस. तुझा योग्य तो सन्मान केला जाईल.'' असे म्हणत सुलतानाने हिरे–माणकांनी भरलेली थैली यासीनच्या स्वाधीन केली.

उड्या मारतच यासीन तिथून बाहेर पडला. आपल्या नशिबावर त्याचा विश्वासच बसत नव्हता. घराच्या दरवाजाजवळ आल्यावरच त्याने आपल्या बायको–मुलांना जोरजोरात हाका मारायला सुरुवात केली. त्याच्या आवाजाने ते सगळेजण धावत पळतच बाहेर आले.

''काय झालं ?'' बायकोने घाबरून विचारले.



''अगं, तुझा विश्वासच बसणार नाही. आपल्याला आता कसलीही काळजी करायची गरज नाही. आपण खूप श्रीमंत झालो आहोत.'' असे म्हणून आज दिवसभरात घडलेल्या सर्व घटना त्याने सांगितल्या आणि हिरे–माणकांची थैली दाखवली. बायको खूश होऊन म्हणाली,

''देवाने आपली इच्छा पूर्ण केली. आपली गरिबी दूर झाली.'' असे म्हणून तिने देवाला हात जोडले.

इकडे सुलतानाच्या राजवाड्यात वेगळाच प्रसंग घडला होता. सेवकाने ते मासे स्वयंपाकीण बाईकडे दिले आणि रात्रीच्या जेवणासाठी त्याचे कालवण करायला सांगितले. एवढे रंगीबेरंगी मासे पाहून तीही आश्चर्यचकित झाली.